आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

७ एप्रिल २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महावितरण कंपनी आता केवळ बिगर कृषी ग्राहकांना वीज वितरीत करणार, कृषी ग्राहकांना वीज वितरणासाठी स्वतंत्र कंपनी

- साखर निर्यातीवर बंदी लादण्याचा विचार नसल्याचं सरकारचं स्पष्टीकरण

- आसाम, केरळम आणि पुदुचेरी विधानसभा निवडणुकीचा प्रचार संपला

**आणि**

- इराणवरचे हल्ले आणखी तीव्र करण्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

**<><><><><>**

महावितरण कंपनीचे कृषी आणि बिगर कृषी अशा दोन कंपन्यांमध्ये विभाजन करायला राज्य सरकारनं आज मान्यता दिली. मुंबईत झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याला मान्यता देण्यात आली. या आणि इतर मंत्रीमंडळ निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(औद्योगिक, वाणिज्यिक, घरगुती आणि इतर सर्व बिगर कृषि ग्राहकांसाठीची वितरण यंत्रणा महावितरण कंपनी हाताळणार आहे. तर कृषी ग्राहकांसाठीची वितरण यंत्रणा एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड ही कंपनी हाताळणार आहे. २०२३ मध्ये या कंपनीची स्थापना झाली होती.*

*महावितरण कंपनीला भांडवली बाजारात सूचीबद्ध करण्यासाठी आयपीओ आणायलाही सरकारनं मंजुरी दिली. विभाजनानंतर सहा ते नऊ महिन्यांच्या कालावधीत महावितरण आयपीओ आणला जाईल. महावितरणनं सुमारे ३२ हजार ६७९ कोटी रुपयांचं कर्ज घेतलं आहे. त्यासाठी सरकार रोखे जारी करणार आहे. )*

**<><><><><>**

मुंबईत मेट्रो ९ आणि मेट्रो २ बी यांच्या पहिल्या टप्प्यांला आजपासून सुरूवात झाली. पश्चिम उपनगरात दहिसर ते काशीगाव तसंच पूर्व उपनगरात मंडाळे

ते चेंबुर मार्गावर या मेट्रो धावणार आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**व्हीसी**

*(दहिसर–काशीगाव हा टप्पा ४ किलोमीटर ४०० मीटर इतक्या लांबीचा असून त्यावर दहिसर पूर्व, पांडुरंगवाडी, मिरागाव आणि काशिगाव अशी चार स्थानकं आहेत. ही सेवा मेट्रो ७ या मार्गाशी जोडल्यामुळे मीरा भाईंदर ते दक्षिण मुंबईत कुलाब्यापर्यंत अखंडित दळणवळण सुविधा उपलब्ध होईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. या मार्गावरचा दुसरा टप्पाही यंदा वर्षअखेरीला सुरू होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.*

***होल्ड.. बाईट - फडणवीस***

*मेट्रो २ बीच्या मंडाळे ते चेंबुर या टप्प्याचं उद्घाटनही आज मुख्यमंत्र्यांनी केलं. या टप्प्यात पाच स्थानकांचा समावेश असून हा टप्पा हार्बर रेल्वे मार्गावरच्या मानखुर्द स्थानकाशी जोडला जाईल. या दोन्ही मार्गांवर उद्यापासून नियमित सेवा सुरू होईल. देशातल्या पहिल्या पॉड टॅक्सी प्रकल्पाचं भूमिपूजनही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. मुंबईत कुर्ला ते वांद्रे-कुर्ला संकुल परिसरात हा प्रकल्प सुरू होणार आहे. या मार्गात दोनशे मीटरच्या अंतरावर २२ स्थानकं असतील. चालकाविना, बॅटरीवर चालणाऱ्या एका पॉड टॅक्सीमध्ये सहा प्रवासी बसू शकतील. दर १५ सेकंदांनी ही पॉड उपलब्ध असेल आणि प्रवाशांनी निवडलेल्या स्थानकवरच ती थांबेल. )*

**<><><><><>**

साखरेच्या निर्यातीवर बंदी घालण्याचा सरकारचा विचार नाही असं खाद्यान्न सचिव संजीव चोप्रा आज नवी दिल्लीत म्हणाले. देशांतर्गत  साखरेच्या किमती मध्ये फारशी वाढ झालेली नाही , पण साखरेच्या किमान विक्री किमतीत वाढ करण्याच्या उद्योजकांच्या मागणीवर सरकार विचार करत आहे असं ते म्हणाले. पश्चिम आशियातल्या युद्धपरिस्थितीमुळे साखरेच्या किमती जगभरात वाढल्या असल्याचा फायदा भारतीय निर्यातदारांना होऊ शकेल, आणि निर्यात करूनही देशात साखरेचा साठा  शिल्लक राहिल्यास त्याचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी करता येईल असं त्यांनी सांगितलं. पेट्रोलियम पदार्थांच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर पेट्रोलमध्ये इथेनॉलचं प्रमाण वाढवण्यावर विचार  करण्यासाठी सरकारने तज्ज्ञांची एक समिती गठीत केली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आसाम, केरळम आणि पुदुचेरी विधानसभा निवडणुकीसाठीचा प्रचार आज संध्याकाळी समाप्त झाला. इथे गुरुवारी मतदान होईल. तोपर्यंत कोणत्याही प्रकारच्या जाहीर प्रचाराला बंदी आहे.

पश्चिम बंगालमधली तृणमूल काँग्रेसची राजवट लवकरच संपुष्टात येईल, असा विश्वास ज्येष्ठ भाजपा नेते आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केला. ते आज पश्चिम बंगालच्या बराकपोर इथल्या जाहीर सभेत बोलत होते. तृणमूल काँग्रेसनं राज्यात घुसखोरीला सहाय्य केलं, असा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, केंद्रातल्या भाजपाप्रणित सरकारनं आवास योजनेचा निधी रोखून ठेवल्याचा आरोप तृणमूल काँग्रेस अध्यक्ष आणि राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला. आज त्यांनी नदिया जिल्ह्यात विविध ठिकाणी प्रचारसभा घेतल्या.

**<><><><><>**

केरलम मधल्या शबरीमला मंदिरात १० ते ५० वर्षे वयाच्या महिलांना प्रवेशावर असलेली बंदी उठवण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा २०१८ मधला निर्णय चुकीच्या पद्धतीने घेतला गेला असून त्यावर पुनर्विचार होण्याची आवश्यकता आहे असं म्हणणं  केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयासमोर मांडलं आहे. या वयोगटातल्या महिलांना शबरीमला मंदिरात प्रवेश नाकारणे म्हणजे एक प्रकारची  अस्पृश्यता असून संविधानातल्या १७ व्या कलमाचे उल्लंघन आहे या सर्वोच्च न्यायालयाच्या विधानावर सरकारने हरकत घेतल्याचं महाधिवक्ता तुषार मेहता यांनी आज न्यायालयात सांगितलं.

**<><><><><>**

दिल्लीतल्या अनधिकृत वसाहती 'आहेत तिथे, आहेत तशाच' तत्वावर नियमित करण्याची घोषणा गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल यांनी

केली. भविष्यातल्या कोणत्याही बांधकामासाठी मात्र महानगरपालिकेच्या नियमांचं काटेकोरपणे पालन करणं बंधनकारक असेल, असंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><>**

मणिपूरमधल्या बिष्णुपूर जिल्ह्यातल्या डोंगराळ भागात संशयित दहशतवाद्यांनी केलेल्या बॉम्ब हल्ल्यात दोन बालकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर या प्रदेशातल्या ५ जिल्ह्यात जोरदार निदर्शनं सुरु आहेत. काल रात्री झालेल्या बॉम्ब स्फोटात दोन्ही बालकांचा जागीच मृत्यू झाला होता. प्रशासनानं या भागातील इंटरनेट सेवा ३ दिवसांसाठी खंडित केली आहे. या घटनेचा तपास राष्ट्रीय तपास संस्थेकडे सोपवला जाणार आहे, अशी माहिती मणिपूरचे मुख्यमंत्री युम्नाम खेमचंद यांनी दिली.

**<><><><>**

सुरुवातीच्या काळात घसरलेले शेअर बाजार आज दुपारनंतर वधारले. कच्च्या तेलाच्या घसरलेल्या किमती आणि आंतरराष्ट्रीय बाजारातली सुधारलेली परिस्थिती यामुळे देशातल्या तेजी झाली. दिवसअखेर सेन्सेक्स ५१० अंकांनी वधारुन ७४ हजार ६१७ अंकांवर बंद झाला. निफ्टी १५५ अंकांनी वधारुन २३ हजार १२४ अंकांवर बंद झाला. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागात आज मोठी तेजी होती.

दरम्यान, एअर इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक कॅम्पबेल विल्सन यांनी आज राजीनामा दिला. २०२६ मध्ये हे पद सोडणार असं त्यांनी २ वर्षांपूर्वी कळवलं होतं, असं एअर इंडियाच्या पत्रकात नमूद आहे. त्यांचा उत्तराधिकारी शोधण्यासाठी एअर इंडियानं एका समितीची स्थापना केली आहे.

**<><><><>**

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत झालेले निर्णय गव्हर्नर संजय मल्होत्रा उद्या सकाळी १० वाजता जाहीर करणार आहेत. नव्या आर्थिक वर्षातली पतधोरण आढावा समितीची ही पहिलीच बैठक कालपासून सुरू झाली आहे. इराण, अमेरिका, इस्त्राइल युद्धाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम, त्यामुळं आर्थिक वृद्धीदरावर होणारा परिणाम वगैरेंच्या बाबत रिझर्व्ह बँक भाष्य करण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

इराणमधले हल्ले आणखी तीव्र करण्याचा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज दिला. इराणमधली संपूर्ण संस्कृती आज रात्री ८पर्यंत नष्ट करू असा इशारा ट्रम्प यांनी समाज माध्यमांवर दिला. हे हल्ले टाळायचे असेल तर होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासह इतर अटी मान्य करण्याचा पर्याय त्यांनी इराणला दिला.

अमेरिकेनं इराणला लष्करीदृष्ट्या पराभूत केलं आहे असा दावा अमेरिकेचे उपाध्यक्ष जे डी व्हान्स यांनी केला. आता होर्मुझची सामुद्रधुनी बंद करुन जगातल्या इतर देशांचं आर्थिक नुकसान करण्याचे काम इराणनं सुरू केलं आहे. पण इराणचं त्यापेक्षा अधिक नुकसान करण्याची अमेरिकेत क्षमता असल्याचा इशारा व्हान्स यांनी दिला आहे.

**<><><><><>**

इराणच्या अल्बोर्झ प्रांतात झालेल्या हवाई हल्ल्यात किमान १८ जण ठार झाले, असं सरकारी माध्यमांनी आज जाहीर केलं. या हल्ल्यांमध्ये २४ जण जखमी झाले आहेत. राजधानी तेहरानही अनेक हवाई हल्ल्यांनी होरपळून निघालं आहे.

**<><><><><>**

देशभरातल्या चित्रपट निर्माते आणि चित्रपट संबंधित कलाकारांना संस्कृती मंत्रालयाने 'वंदे मातरम फ्रेम्स राष्ट्रीय चित्रपटनिर्मिती' स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित केलं आहे. इच्छुक कलाकारांनी यासाठी आपल्या चित्रफिती ' वंदेमातरम वनफिफ्टी डॉट आय एन' या डिजिटल मंचावर सादर करायचं आवाहन मंत्रालयाने केलं आहे.

**<><><><><>**

पाकिस्ताननं भारतातल्या २ हजार ८०० हुन अधिक शीख यात्रेकरूंना व्हिसा जारी केल्याची माहिती निर्वासित ट्रस्ट प्रॉपर्टी बोर्डाच्या प्रवक्त्यांनी दिली आहे. बैसाखी आणि खालसा पंथाच्या ३२७व्या स्थापना दिनानिमित्त पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात १० ते १४ एप्रिल दरम्यान होणाऱ्या विशेष कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी हे यात्रेकरू जाणार आहेत.

**//<><><><><>//**